जिल्हा

देशोन्नती बुलडाणा / रविवार दि. २५ ऑगस्ट २०१३

# शिवाजी महाविद्यालयात 'नो व्हेयिकल डे'

*तालुका प्रतिनिधी/२४ऑगस्ट*

**चिखली :** स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दर गुरूवारी एक दिवस 'नो व्हेयिकल डे' साजरा करण्याचा संकल्प स्वातंत्र्यदिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी यांनी केला. पर्यावरण संवर्धन व इंधनाची बचत करण्यासाठी आणि वायू प्रदूषण रोखण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पेट्रोल व डिझेलवर चालणारी वाहने आणू नये असे आवाहन प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी यांनी केले.

या संकल्पाची सुरूवात २२ ऑगस्ट रोजी गुरूवारपासून करण्यात आली. प्राचार्य डॉ.एन.बी.भुसारी, प्रा.डी.टी.गोरे, प्रा. डी. आर. सावळे, प्रा. पी. जी. सवडतकर, व्ही. डी. सावळे आणि गजू सूसर यांनी महाविद्यालयाच्या गेटवर 'नो व्हेयिकल डे'चे बॅनर लावून पर्यावरण रक्षणाचे महत्व पटवून दिले.




नो व्हेयिकल डे कार्यक्रम राबवितांना महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी

महाविद्यालयात १०० पेक्षा अधिक कर्मचारी असून जवळपास २५०० विद्यार्थी आहेत. यापैकी निम्मी संख्या इंधनावर चालणारी वाहने वापरतात. एका दिवसाचा त्यांचे इंधनाचा खर्चाचा विचार केल्यास किमान एका दिवशी १२५० लि. पेट्रोल वाचू शकते. तसेच त्याची बाजारभावाने अंदाजे किंमत १ लक्ष रू. होते.

सदर इंधन वापरामुळे पृथ्वीचे तापमान, कार्बन उत्सर्जन इ. पर्यावरणास हानीकारक बाबीही घडतात. या दृष्टीने पृथ्वी वा पर्यावरण वाचविण्यासाठी केलेला हा महाविद्यालयाचा उपक्रम आहे.